Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

# पर्यावरण संवर्धनासाठी शिक्षण

**प्रा. मनिषा पाटील,**
**पी. व्ही. जी. कॉलेज ऑफ एज्युकेशन ॲण्ड रिसर्च,**
**नाशिक.**

**प्रास्ताविक** -

रविंद्रनाथ टागोरांच्या शब्दात निसर्ग म्हणजे -

बिनभिंतीची उघडी शाळा, लाखो इथले गुरु,

'निसर्गाला आपण गुरु मानतो. पूर्वीपासून मानव आणि निसर्ग यांचे अतिशय जवळचे नाते आहे, नव्हे तर निसर्गाशिवाय मानवाचा विकास, मानवाचे जीवन हे शून्यच आहे. पर्यावरणाचे संवर्धन ही आजची महत्वाची गरज आहे, या पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी आवश्यकता आहे ती जनचळवळीची.

सामान्य नागरिकांनी एकत्र येऊन ठरविले तर कित्येक समस्यांना उत्तरे मिळू शकतील आणि हे शिक्षणाद्वारे शक्य होईल. शिक्षणामुळेच पर्यावरण संवर्धन घडू शकते.

मानवजातीला आज ज्या प्रमुख समस्येला तोंड द्यावे लागत आहे ती म्हणजे पर्यावरणाची हानी. दिवसेंदिवस होणारी जंगलतोड प्रदुषण यामुळे एका भयानक समस्येचे तांडव निर्माण झालेले आहे आणि आता ब-याच ठिकाणी ही पर्यावरणीय समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना करतांना दिसतात. परंतु ही पर्यावरणीय समस्या सोडविण्यासाठी आज जी पावले उचलतो आहोत ती फक्त एखाद्या सैतानी वृक्षाच्या फांद्यांच्या वरवरची छाटणी आहे. त्याची मुळे उपटण्याची केलेली उपाययोजना नाही. आपण आपल्या वाढत्या गरजांपोटी निसर्गाशी करत असलेले वर्तन आपल्याला बदलावे लागेल. हे शक्य आहे ते शिक्षणाद्वारेच, आपण लोकांच्या विचारात बदल घडवून आणून या राक्षसी समस्येचे स्वरुप लोकांसमोर मांडू शकतो यातून मग आपण पर्यावरण संवर्धन करु शकतो. पर्यावरण संवर्धनाचे महत्व लक्षात आणून देवू शकतो.

मी एकटा काय करु शकतो ? आणि मीच का करायच ? असा विचार न करता मी सुरुवात केली तर पर्यावरण रक्षणात माझा खारीचा वाटा असेल हा विचार मनात आणि कृतीत येणे आवश्यक आहे. आणि त्यातूनच मग पर्यावरण संवर्धनासाठी ख-या अर्थाने उपाययोजना करता येतील.

आपल्या संस्कृतीने पर्यावरणाचे संवर्धन, संरक्षण, संतुलन याला महत्त्व दिले आहे. मानव व पर्यावरण यांचा घनिष्ठ संबंध आहे. मानवाचे अस्तित्व आणि विकस पर्यावरणाच्या गुणवत्तेवरच अवलंबून आहे. म्हणून आपल्या वसुंधरेला या प्रदुषण व इतर समस्यांच्या विळख्यातून सोडविण्यासाठी शिक्षणाद्वारे पर्यावरण विषयक जाणिवा निर्माण

होतील. मानवी प्रयत्नातून निसर्गाचे संवर्धन हे शक्य आहे. त्यासाठी शिक्षणातून आपण प्रयत्न करणे गरजेचे आहे. शिक्षणाद्वारे व्यक्तीला पर्यावरणातील विविध घटक, त्यांचे परस्परांवर अवलंबून असणे, पर्यावरणीय समस्या व त्यावरील उपाय, पर्यावरण संरक्षण व संवर्धन याबाबतचे ज्ञान प्राप्त होईल. शिक्षणामुळेच पर्यावरण जनजागृती व्यक्तींमध्ये पर्यावरणाबाबत सकारात्मक दृष्टीकोन विकसित होतील.

- **पर्यावरण - व्याख्या -**

  पर्यावरण म्हणजे सभोवतालची परिस्थिती होय. ज्यामध्ये नैसर्गिक आणि मानवनिर्मित अशाा अनेक घटकांचा समावेश झालेला असतो.

- **वेबस्टर शब्दकोश :-**

  “ एखाद्या सजीवांवर परिणाम करणा-या सर्व बाह्य घटकांचा समावेश “ (भौतिक व जैविक ) पर्यावरणात होतो.

- “ कोणत्याही बाह्य शक्तीचा होणारा परिणाम म्हणजे पर्यावरण होय “. डॅ.रॉस.
- पृथ्वीवरील सर्व घटकांचे आकलन त्याचा मानवी जीवनावर होणा-या परिणामांचा अभ्यास म्हणजे पर्यावरण शास्त्र होय - जॉन टर्क

- **पर्यावरण संवर्धन - अर्थ**

  मॅकमिलन यांच्या शब्दकोशानुसार स्त्रोतांची किंमत, त्यांचे वैशिष्ट्य व त्यांचा दर्जा उंचावणे व त्यांच्या पुरवठ्यात सातत्य राखणे, या दृष्टीने त्यांचे नियोजन व व्यवस्थापन करणे यालाच ‘ संवर्धन ‘ असे म्हणतात.

  पर्यावरण संवर्धन याचा अर्थ जमीन (मृदा), पाणी, हवा, खनिजे व अन्य नैसर्गिक स्त्रोतांचा जपून वापर करणे किंवा पुढे जाऊन असे म्हणता येईल की, शक्य तेवढी दूरदृष्टी वापरुन व निसर्गाशी सहकार्य करुन मानवाने पर्यावरणाचा केलेला पूर्वनियोजित वापर म्हणजे पर्यावरण संवर्धन.

  सद्य:स्थितीची राखण व त्यात अधिकाधिक सुधारणा घडवून आणणे म्हणजे संवर्धन होय.

**पर्यावरण संवर्धनाचे उद्दिष्टे पुढीलप्रमाणे :-**

- पर्यावरणाचे संतुलन राखणे
- नैसर्गिक अधिवासात प्राणी ाणि वनस्पती यामधील परिसंस्थायुक्त सहसंबंध कायम राखणे.
- पर्यावरणातील विविध घटकांचे रक्षण करणे.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

- दर्मिळ प्राणी आणि वनस्पतींना नामशेष होण्यापासून वाचविणे.
- कायदेविषयक माहितीचा प्रसार व अंमलबजावणी करणे.
- सजीवसृष्टीचे जतन संरक्षण करणे.

**पर्यावरण संवर्धनाची गरज** :-

१. मानवाच्या वाढत्या गरजांमुळे वनांची अमर्याद तोड, वनांची जागा शेती, कारखाने, धरणे, रस्ते, इमारती इ.नी घेतली आहे. लोकसंखेबरोबरच पाणी, उर्जा, खनिजे, इंधन इ. गोष्टींच्या मागण्या वाढल्या आहेत त्यामुळे पर्यावरणातील, नैसर्गिक स्त्रोतांच्या उपलब्धतेवरील ताण वाढत आहे, स्त्रोत -हास पावत आहेत म्हणून त्यांचे संवर्धन करणे काळाची गरज आहे.

२. भारताने लोकसंखेत मजल गाठली आहे. या लोकसंख्या वाढीमुळे प्रत्येक क्षेत्रात जीवघेणी स्पर्धा निर्माण झाली आहे. ज्यामुळे मानवाच्या गरजाही वाढत आहे. आणि त्याचा परिणाम हा पर्यावरणावर होत आहे. म्हणून पर्यावरण संवर्धनाची गरज निर्माण झाली आहे.

३. नैसर्गिक साधन संपत्तीचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे. म्हणजेच नैसर्गिक साधन संपत्तीचे एक प्रकारे शोषण होत आहे. मानवी विकास हा पर्यावरणाच्या जोडीनेच शक्य आहे. त्यासाठी पर्यावरण संवर्धन ही सामाजिक आंतरराष्ट्रीय गरज आहे.

४. वनस्पती, प्राणी यांच्या विविध जाती व प्रजातींचा मोठ्या प्रमाणावर -हास होत आहे. पृथ्वी भोवती असलेल्या ओझोन वायूच्या संरक्षक कवचास हानी पोहोचत आहे. आम्ल पर्जन्य, हरितगृह परिणाम यामुळे पृथ्वीचे संपत आलेले आयुष्य ही धोक्याची सूचना आहे.

५. वाढते प्रदूषण ज्यामळे पृथ्वीवरील केवळ मानवच नव्हे तर वनस्पती प्राणी, सूक्ष्मजीव यांचेही अस्तित्व धोक्यात येणार आहे. त्यामुळे पर्यावरणविषयक ज्ञानाची आवश्यकता सर्वांना आहे. आणि त्यासाठी पर्यावरण संवर्धन गरजेचे आहे.

६. सर्वसमावेशक संतुलित जीवन जगण्याची गरज आहे. यासाठी मानवजात ही पर्यावरणीय साक्षर झाली पाहिजे व त्याने पर्यावरणाचे जतन व संवर्धन करणे आवश्यक आहे.

७. मानव आणि पर्यावरण यातील सहजीवन निर्मितीसाठी लोकसंख्या व जैवसंख्या यांचे प्रमाण संतुलित राखून व प्रदुषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी, निरंतर शाश्वत पर्यावरणाचा सर्वसमावेशक संतुलित विकासासाठी पर्यावरण संवर्धनाची गरज आहे.

**पर्यावरण संवर्धन आवश्यकतेची कारणे :-**

1. प्रचंड लोकसंख्या वाढ
2. प्रचंड प्रमाणात जंगलतोड
3. पर्यावरण जागृतीचा अभाव
4. अनियंत्रित ध्वनी प्रदुषण
5. औद्योगिकरणामुळे प्रदुषण (जल, वायू, भूमी)
6. नियम व कायद्यांना मर्यादा
7. सूपिक जमिन व वनांचा -हास
8. साक्षर व निरक्षर अशा सर्वांमध्ये पर्यावरण जागृतीचा अभाव.

**शिक्षण, पर्यावरण संवर्धन :- उपाययोजना**

पर्यावरणातून एखाद्या गोष्टीची तूट / कमतरता झाली की, ती स्वत:हून भरुन काढली जाणे हा निसर्गनियम असतो. परंतु मानवाने ज्या पध्दतीने व वेगाने निसर्गाची लूट व संहार चालविला आहे त्या वेगाने निसर्ग स्वत:चा बचाव करु शकत नाही. त्यासाठी मानवानेच स्त्रोतांच्या पुनर्भरणास हातभार लावणे गरजेचे आहे.

शिक्षणाद्वारेच आपण मानवी जीवनातील पर्यावरणाचे महत्व लोकांना पटवून देवू शकतो आणि त्यातूनच पर्यावरण संवर्धन यासाठी उपाययोजना व उपक्रम राबविता येतील ज्यामुळे आपणास पर्यावण संवर्धन करणे शक्य होईल.

शाळा महाविद्यालयात पर्यावरण शिक्षण हा विषय लागू करावा. शिक्षणाद्वारे विविध उपक्रमातून पर्यावरणाचे संवर्धन कसे शक्य होईल यासाठी विविध उपक्रमांची अमलबजावणी शाळा, महाविद्यालय, विविध सामाजिक उपक्रमाद्वारे करणे गरजेचे आहे. ज्यामुळे पर्यावरण संवर्धन जाणिवा निर्माण होतील.

पर्यावरण संवर्धनासाठी शाळा / महाविद्यालय - विविध उपक्रमांचे आयोजन :-

1. विवीध स्पर्धांचे आयोजन करावे.
2. पर्यावरण प्रदर्शन आयोजन
3. चर्चासत्रे, शिबीर आयोजन
4. विविध प्रात्यक्षिके
5. वृक्षदिंडी
6. पर्यावरण बचाव मोहिम
7. प्रसार माध्यमाद्वारा कार्यक्रम

8. सांस्कृतिक कार्यक्रम
9. सहलींचे आयोजन
10. दिनविशेष साजरे करणे
11. पर्यावरणविषयक कात्रणे
12. सणांद्वारे जनजागृती
13. घोषवाक्य स्पर्धा

विविध उपक्रमांच्या माध्यमातून शाळा, महाविद्यालयातून पर्यावरण संवर्धनासाठी जनजागृती होणे आवश्यक आहे. म्हणजेच पर्यावरण संवर्धनासाठी शिक्षण असा दृष्टीकोन आपला तयार होणे आज काळाची गरज आहे. आपण सर्वांनी मिळून या कामात सहभागी होऊन पर्यावरण संवर्धनाचा संदेश शिक्षणातून सर्वत्र पोहचविणे पहिले कर्तव्य आहे.

**संदर्भ सूची :-**

पर्यावरण शिक्षण आणि आपत्ती व्यवस्थापन - डॉ.किशोर चव्हाण, प्रा.शोभा आहेर
पर्यावरण शिक्षण - प्रा.नीला पाथरे
पर्यावरण शिक्षण - डॉ.हेमलता पारसनीस, डॉ.जयश्री बहूलीकर
पर्यावरण जाणीव जागृती - डॉ. डी.वाय आहिरराव, डॉ. एस. के. पगार
पर्यावरण शिक्षण - डॉ. के.म. भांडारकर.